# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

<u>तक्रार अर्ज क्रं.२५/२०२२</u>

श्री.शशिकांत महादेव बामणे
मु.पो.भडकंबे, ता.वाळवा,
जि.सांगली ४१६३०२ } तक्रारदार

विरूध्द्

१. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर,
ता.वाळवा,जि.सांगली
२. महात्मा फुले शिक्षण संस्था, ऊरण इस्लामपूर
ता.वाळवा,जि.सांगली. } वि.प.

महात्मा फुले शिक्षण संस्था, ऊरण इस्लामपूर ता.वाळवा, जि.सांगली यांचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर येथील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.शशिकांत महादेव बामणे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२९/०९/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१) मला सहाव्या वेतन आयोगानुसार शिपाई या पदावरती दि.०५/०५/२०२१ रोजी १२ वर्ष पुर्ण होतात. २) मला सातव्या वेतन आयोगानुसार दि.०५/०५/२०१९ रोजी १० वर्ष पुर्ण होतात.

मी दि.२८/०५/२०२२ रोजी पदोन्नतीसाठी मा.प्राचार्य यांना लेखी अर्ज केला होता. परंतू त्यांनी मला पदोन्नती देता येत नाही म्हणून लेखी सांगितले आहे. त्याचे कारण त्यांनी शिक्षकेत्तर कर्मचारी रोस्टर पूर्ण नाही हे सांगितले आहे. परंतू कॉलेजचे रजिस्टार मा.कदम सर यांनी मा.शिक्षण सह संचालक कोल्हापूर यांच्या तोंडी आदेशानुसार इतर सहा कर्मचारी यांना २३ वर्ष मागील पद मान्यता बरोबर ग्राहय धरून पदोन्नती दिली आहे. २३ वर्षापासून आजअखेर तीन पदमान्यता झालेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे १)१९९८—९९ २)२०१७-१८, १९९८ ची विद्यार्थी संख्या व २०१७-१८ ची विद्यार्थी संख्या या मध्ये फार मोठी तफावत आहे. रोस्टरचे काम वेळेत पूर्ण न होवू शकल्यामुळे सद्या माझे आर्थिक नुकसान होत आहे. या होणा-या आर्थिक नुकसाणीस जबाबदार कोण?

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

दि.०७/०४/२०२२ पासून श्री.बामणे यांच्यावरील सेवाजेष्ठ सेवकांना शिपाई पदावरून प्रयोगशाळा परिचर पदावर पदोन्नती दिलेली आहे. श्री.बामणे हे सेवाजेष्ठतेनुसार सेवाजेष्ठता यादीमध्ये सर्वात खालच्या क्रमावर आहेत. दि.०४/११/२०२२ रोजीच्या त्यांच्या अर्जामध्ये त्यांनी मला दि.०१/०१/२०२२ पासून पदोन्नती देण्यात यावी असे नमूद केलेले आहे. परंतू सेवाजेष्ठता नियमानुसार त्यांना त्यांच्या अधि पदोन्नती/वेतननिश्चिती झालेल्या सेवकांच्या दिनांकापासून किंवा त्यानंतरच्या दिनांकापासून पदोन्नती देता येते. त्याबाबतची माहिती कॉलेज प्रशासनाकडून त्यांना दिलेली आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

कॉलेजकडील जा.क्र. ७४७ दि.१०/११/२०२२ रोजी प्राप्त पत्रामध्ये व पत्रासोबतच्या अर्जामध्ये श्री.एस.एम.बामणे यांनी दि.०१/०१/२०२२ पदोन्नतीची मागणी केलेली आहे. परंतू श्री.बामणे हे सेवाजेष्ठ यादीमध्ये सर्वात खालच्या क्रमांकावर आहेत. त्यांना त्या दिनांकानंतर पदोन्नती देता येते. याबाबतचे संस्थेकडील जा.क्रं.३६६ दि.११/११/२०२२ च्या पत्राने मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तूत तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी दि.२८/०५/२०२२ रोजी पदोन्नतीसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे लेखी अर्ज केला होता. परंतू त्यांनी शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे रोस्टर पूर्ण नसल्यामुळे पदोन्नती देता येत नसल्याचे लेखी तक्रारदार यांना कळविले आहे.

तक्रारदार व संस्था, महाविद्यालय यांचे लेखी व तोंडी म्हणणे समितीने विचारात घेतले असता याबाबत समितीस काही बाबी निदर्शनास आल्या. संस्था, महाविद्यालयाच्या म्हणण्यानुसार तक्रारदार सेवाजेष्ठता यादीनुसार सर्वात खालच्या क्रमांकावर आहे. सदर बाब तक्रारदाराने समितीसमोर मान्य केली आहे व सदर बाब अमान्य केल्याचे समितीसमोर दाखल केलेल्या कागदपत्रातूनही दिसून येत नाही. संस्थेचा अभिप्राय अवलोकनी घेता संस्था तक्रारदार यांना

पदोन्नती नाकारत नाही. परंतू तक्रारदार यांच्या मागणी तारखेपासून देता येत नसलेचे कथन करते.

या प्रकरणी तक्रारदार यांनी मा.शिक्षण सह संचालक कोल्हापूर यांच्या तोंडी आदेशानुसार महाविद्यालयातील सहा कर्मचा-यांना २३ वर्ष मागील पद मान्यता बरोबर ग्राहय धरून पदोन्नती दिली आहे. २३ वर्षापासून आजअखेर तीन पदमान्यता झालेल्या आहेत. १९९८—९९, २०१७-१८, १९९८ ची विद्यार्थी संख्या व २०१७-१८ ची विद्यार्थी संख्या या मध्ये फार मोठी तफावत आहे. रोस्टरचे काम वेळेत पूर्ण न होवू शकल्यामुळे सद्या आर्थिक नुकसान होत असल्याचे नमूद केले आहे. तसेच या प्रकरणावरील सुनावणीमध्ये तक्रारदार यांनी समितीसमोर शासनाच्या एचटीई पोर्टलवर जानेवारी २०२२ व एप्रील २०२२ मध्ये प्रयोगशाळा पदांची एकूण संख्या १८ एवढी तसेच रिक्त पदांची संख्या ११ असल्याचे कथन करून तशी कागदपत्रे समितीसमोर सादर केली.

तक्रारदार यांनी सादर केलेल्या शासनाच्या एचटीई पोर्टलवरील कागदपत्रांवरून जानेवारी २०२२ व एप्रील २०२२ मध्ये महाविद्यालयात प्रयोगशाळा परिचर पदांची एकूण संख्या १८ तसेच रिक्त पदांची संख्या ११ होती. तसेच या अकरा रिक्त पदांमधून संस्थेने एप्रील २०२२ मध्ये महाविद्यालयातील सहा कर्मचा-यांना पदोन्नती दिलेली असून अद्यापी ०५ पदे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरची बाब संस्था व महाविद्यालय यांचे निदर्शनास आणली असता संस्था व महाविद्यालयाने मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पदोन्नतीस मान्यता मिळण्याचे अधिन राहून तक्रारदार यांना दि.०७/०४/२०२२ पासून पदोन्नती देण्याची तयारी दर्शवली.

तथापि तक्रारदार यांनी आपण दि.०१/०१/२०२२ पासून पदोन्नतीस पात्र आहे. सबब आपणास दि.०७/०४/२०२२ ऐवजी दि.०१/०१/२०२२ पासूनच पदोन्नती देण्यात यावी अशी मागणी केली. तथापि वि.प. यांनी संस्थेच्या दि.०७/०४/२०२२ रोजीच्या ठरावानूसार महाविद्यालयातील इतर सेवाजेष्ठ कर्मचा-यांना एप्रील २०२२ पासून पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानुसार एप्रील २०२२ पासूनच तक्रारदार यांना पदोन्नती देण्याची कार्यवाही केली जाईल असे कथन केले.

दोन्ही पक्षकारांनी समितीसमोर सादर केलेल्या लेखी व तोंडी म्हणण्यानुसार समितीस खालील बाबी निदर्शनास आल्या की, शासनाच्या एचटीई पोर्टलवरील कागदपत्रांवरून जानेवारी २०२२ व एप्रील २०२२ मध्ये महाविद्यालयात प्रयोगशाळा परिचर पदांची एकूण संख्या १८ तसेच रिक्त पदांची संख्या ११ होती. रिक्त पदांमधून संस्थेने सहा कर्मचा-यांना एप्रील २०२२ पासून पदोन्नती दिली आहे. तथापि तक्रारदार व महाविद्यालय प्राचार्य यांनी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण विभाग कोल्हापूर यांचे दि.२९/११/२०२२ रोजीचे पत्र समितीकडे सादर केले. सदर पत्र अवलोकनी घेता त्यामध्ये नमूद केलेला मजकूर 'संस्थेकडील यापूर्वी देण्यात आलेल्या पदोन्नतीवेळी आपण सादर केलेली सेवाजेष्ठता पाहता आपण दिलेली पदोन्नती ही सेवाजेष्ठ कर्मचारी यांचे नंतर श्री.बामणे यांचा सेवाजेष्ठता क्रमांक येत असल्यामुळे सेवाजेष्ठतेचे अधिनियमानुसार सेवाजेष्ठ असलेल्या कर्मचारी यांचे पदोन्नती/स्थाननिश्चिती केलेल्या दिनांकानंतर श्री.बामणे यांना सेवानिवृत्ती, राजीनामा, मृत्यू व वेडसरपणा इ.मुळे रिक्त झालेल्या पदावर पदोन्नती प्रचलित शासन ध्येय धोरणे, शासन निर्णय, परिपत्रके यांच्या अधिन राहून करणेस नियुक्ती प्राधिकारी म्हणून आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात यावा' असे जनरल सेक्रेटरी, महात्मा फुले शिक्षण संस्था, उरण-इस्लामपूर, जि.सांगली यांना कळविलेचे दिसून येते.

जर तक्रारदाराची मागणी, की त्यांना दि.०१/०१/२०२२ पासून पदोन्नती द्यावी. परंतू ती मान्य करावयाची झाल्यास, दि.०७/०४/२०२२ पासून त्याच्यापेक्षा सेवाजेष्ठता प्राप्त कर्मचा-यांना पदोन्नती दिलेली आहे, त्यांच्या सेवाजेष्ठता यादीवर प्रतिकुल परिणाम होईल. कारण तसे झाल्यास तक्रारदारास त्या पदोन्नतीने तयार झालेल्या सेवाजेष्ठता यादीत, त्याचेपेक्षा सेवेत जेष्ठता प्राप्त केलेल्या त्याचे समकक्ष कर्मचा-यांपेक्षा कारण नसताना तक्रारदारास जेष्ठता दिल्यासारखे होईल. केवळ एका तारखेपासून पदोन्नती मिळालीच पाहिजे असे कर्मचारी कायद्याने म्हणू शकत नाही. तो पदोन्नतीस पात्र आहे किंवा नाही आणि कोणत्या तारखेपासून हे ठरविण्याचा हक्क केवळ त्याचे वरिष्ठांना असतो. सबब तक्रारदाराची ही मागणी मान्य करता येत नाही.

उपरोक्त शासन पत्र तसेच समितीसमोरील दाखल कागदपत्रे अवलोकनी घेता संस्थेने प्रयोगशाळा परिचर पदांच्या ११ रिक्त पदांमधून दि. ०७ एप्रील २०२२ मध्ये महाविद्यालयातील ०६ शिपाई या पदावरील कर्मचा-यांना प्रयोगशाळा परिचर या पदावर पदोन्नती दिली असून अद्याप ०५ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास येते. सबब या रिक्त पदामधून तक्रारदार यांना संस्थेकडून

पदोन्नतीची कार्यवाही करता येईल असे समितीचे मत आहे. करिता समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची दि.०१/०१/२०२२ पासून पदोन्नती मिळणेची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

२. संस्था व महाविद्यालयाने प्रयोगशाळा परिचर या पदाच्या रिक्त पदावर पदोन्नतीबाबत प्रचलित शासन ध्येय धोरणे, शासन निर्णय, परिपत्रके यांच्या अधिन राहून नियमानुसार दि.०७ एप्रिल २०२२ पासून तक्रारदार यांना पदोन्नती देण्याबाबतची योग्य ती कार्यवाही तीन महिन्यांच्या आत करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 23/11/2023

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)